# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १० एप्रिल, २०१३

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**रोजगार हमी योजना मंत्री** : **"पाथरी मतदार संघातील बहुतांशी गावात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत"** या विषयावरील श्रीमती मीराताई रेंगे-पाटील, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ५३६९४ ला दिनांक ८ ऑगस्ट, २०११ रोजी चर्चेच्या वेळी मा.अध्यक्षांनी दिलेल्या निदेशान्वये प्रश्नाबाबतची अधिक माहिती (पॉलिसी स्टेटमेंट) सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उद्योग मंत्री** :

(क) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन २००४-२००५ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

(क) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ग) पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक लेखे संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(च) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) कामगार मंत्री** : (क) नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या वर्षांचा अनुक्रमे सव्वीसावा व सत्तावीसावा लेखापरिक्षण अहवालासह वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, (लासलगांव) यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे एकविसावा व बावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) दि रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंट्स लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे तेहतीसावा व चौतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरीता) यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा अकरावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सहा : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**सात : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री मंगल प्रभात लोढा,** गोपाळ शेट्टी, योगेश सागर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबईतील नागरिकांना आधारभूत सेवा-सुविधांपासून मोठया प्रमाणावर वंचित रहावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, मोठया प्रमाणावर वाढणाऱ्या असुविधेमुळे मुंबईतील लाखो लोकांना विविध प्रकारचा त्रास होणे, सार्वजनिक सुविधा अपुऱ्या पडत असल्याने वीज, पाणी, रस्ते या सर्व सुविधांवर अतिरिक्त भार पडणे, परिणामी संपूर्ण शहरातील वाहतुकीचे प्रमाण वाढल्याने वाहतुक कोंडी निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत होणे, त्यामुळे मुंबई शहरासाठी शासनाने आधारभूत सेवा-सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिल्यास हाजीअली ते नरिमन पॉईंट सी लिंक, मेट्रो आणि मोनो रेल तातडीने सुरू केल्यास मुंबईचा विकास होऊन मुंबईच्या दयनीय स्थितीमध्ये फरक पडण्याची शक्यता निर्माण होणे, परंतु सोयी-सुविधांकडे शासनाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे जनतेमध्ये शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र स्वरूपाचा असंतोष, त्यामुळे शासनाने मुंबई शहराकरिता तातडीने दहा हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.आर.एम.वाणी,** श्रीमती मीराताई रेंगे-पाटील, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण** मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-

"सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील ९०८८ खतमिश्रीत गव्हाचा साठा महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ जाधववाडी औरंगाबाद येथे एक वर्षापासून पडून असणे, औरंगाबाद जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानांमध्ये खतमिश्रीत गव्हाचा साठा वितरीत होत असल्याच्या तक्रारी करण्यात येणे, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये अत्यल्प पावसामुळे दुष्काळ असणे, खतमिश्रीत गव्हाचा साठा वितरीत होत असल्याच्या चौकशीची मागणी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अन्न व औषध प्रशासन यांच्याकडे लोकप्रतिनिधी यांनी करणे, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी तपासणी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहायक आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, जिल्हा पुरवठा अधिकारी, सहायक लेखाधिकारी, जिल्हा लेखा परीक्षक अधिकारी अशा पाच जणांची संयुक्त समिती गठीत करणे, संयुक्त समितीने दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, जाधववाडी,

औरंगाबाद येथे तपासणी करणे, तपासणीमध्ये गोदाम क्रमांक ५, ७ व १० मध्ये ९०८८ गव्हाच्या पोत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात खतमिश्रित गव्हाचा साठा आढळून येणे, गोदाम क्रमांक ५, ७ व १० मध्ये ९०८८ खतमिश्रित गव्हाचा साठा संयुक्त समितीने सील करणे, सदर गव्हाच्या साठ्यामधील २९ गव्हाचे नमुने पुणे येथे प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, समितीने दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ रोजी गोदाम क्रमांक ५, ७ व १० मधील ९०८८ गव्हाच्या पोत्यांमध्ये युरिया, अमोनिया, फॉस्फेट व फॉरेन मॅटर आढळून आल्यामुळे हा सर्व धान्याचा साठा मानवास खाण्यास अयोग्य असून सदर साठा नष्ट करण्याबाबत कळविणे, ९०८८ पोती गव्हाचा साठा नष्ट न करता त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करणे, ९०८८ दूषित रासायनिक गव्हाचा साठा गोदामात पडून असल्यामुळे चांगल्या गव्हाचा साठा साठवणुकीसाठी अडचणी येणे, लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी संबंधित दोषींवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याबाबत अन्न व औषधे प्रशासन विभाग यांना कळविणे, परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष करणे, औरंगाबाद माल धक्क्यावर चांगल्या गव्हामध्ये युरिया मिश्रित केल्यामुळे धान्याच्या नुकसानीच्या वसुलीचे आदेश अन्न महामंडळ यांनी देणे, मानवास खाण्यास अयोग्य असा दूषित रासायनिक ९०८८ पोती गव्हाचा साठा वितरित करण्यासाठी संबंधितांवर दबाव टाकणे, त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील सामान्य जनतेचा जीव धोक्यात येणे, धान्याचा साठा खतमिश्रित व मानवास खाण्यास अयोग्य केल्यामुळे अन्नधान्याच्या वाहतुकीमध्ये दोषी वाहतूक ठेकेदाराला धान्याच्या कामात प्रतिबंध घालण्याकडे दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने तातडीने दोषींवर करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(३)** **सर्वश्री विक्रमसिंह पाटणकर,** शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, दिपक चव्हाण, मकरंद पाटील, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुर्नवसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"हिंदू वारसा कायद्याप्रमाणे वडिलोपार्जित मिळकतीमध्ये भावाबरोबर बहिणींना समान हक्क मिळणे, त्यानुसार प्रकल्पबाधित व्यक्तीच्या व्याख्येमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने घेऊनसुध्दा प्रस्ताव प्रलंबित असणे, तसेच प्रकल्पग्रस्तांच्या इतर मागण्यांबाबत मा.मुख्यमंत्र्यांसमवेत दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी श्रमिक मुक्तीदलासोबत झालेली चर्चा, धरणग्रस्तांच्या मागण्यांबाबत त्वरित निर्णय घेण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री यांनी देऊनसुध्दा अधिकाऱ्यांनी त्यावर अद्यापही निर्णय न घेणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, प्रकल्पग्रस्तांनी दिनांक ११ एप्रिल, २०१३ पासून राज्यव्यापी आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, या आधी दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी प्रकल्पग्रस्तांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सुरू असलेले आंदोलन स्थगित करणे, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर त्वरित निर्णय घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**आठ : शासकीय विधेयक :-**

(अ) **सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०११ च्या संबंधात मा.राज्यपाल यांच्याकडून आलेला संदेश.**

(ब) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचा प्रस्ताव - (म.वि.स. नियम १५४ अन्वये) :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०११ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**नऊ : सन २०१३ - २०१४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (सातवा दिवस).**

(१) गृह विभाग.

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

(३) गृहनिर्माण विभाग.

(४) पर्यावरण विभाग.

(५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

(६) महिला व बालविकास विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**दहा : शासकीय विधेयक:-**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), महादेव बाबर, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील पाटील, गोपाळ शेट्टी, सुधाकर भालेराव, श्रीमती पंकजा**

**मुंडे-पालवे, सर्वश्री संजय भेगडे, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री सुरेश हाळवणकर, प्रमोद जठार, रविंद्र चव्हाण, नानाजी शामकुळे, अबू आजमी, प्रकाश शेंडगे, रविंद्र वायकर, विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, योगेश सागर, भरतशेठ गोगावले, सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, शरद पाटील, राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, डॉ.सुजित मिणचेकर, श्री. चिमणराव पाटील, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, सर्वश्री चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, अनिल कदम, धनराज महाले, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री विजयराज शिंदे, संतोष सांबरे, संजय (बंडू) जाधव, आर.एम.वाणी, सुभाष देसाई, विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र करमणूक शूल्क (सुधारणा) अध्यादेश, २०१३ नापसंत करते."

(ख) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शूल्क (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, अतुल देशकर, विजयकुमार देशमुख, संजय राठोड, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, प्रकाश महेता, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर

करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पाटील, श्रीमती मिनाक्षी पाटील, श्री.धैर्यशील पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ एप्रिल, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.